# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/12/2022 (मंगळवार) सकाळ

### दुखापत

**१) पो.स्टे. भिवापूर** :– अंतर्गत १७ कि.मी. अंतरावरील मौजा टाका भिवापूर येथे दिनांक ११/१२/२०२२ चे ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– निलकंठ रामकिसन पुंड, वय ५९ वर्ष, रा. टाका ता. भिवापुर यांचे घरा शेजारी राहणारे आरोपी नामे– संदीप शिवनकर नमुद घटनावेळी फिर्यादी हे आपले घरी हजर असतांना आरोपी संदीप शिवनकर हा दारू पिवुन फिर्यादीचे घरासमोर आला व फिर्यादीला शिवीगाळ केली तेव्हा फिर्यादीने म्हटले की ''तु शिवीगाळ कशाला करतो'' असे म्हटले असता आरोपी संदीप शिवनकर याने चिडून फिर्यादीचे डोक्यावर व डाव्या हातावर लोखंडी सळाखीने मारून जखमी केले त्या नंतर फिर्यादीचा मुलगा नामे– निखिल पुंड हा भांडण सोडविण्याकरीता आला असता त्याला सुध्दा आरोपी संदीप शिवनकर याने लोखंडी सळाखीने डोक्यावर मारून जखमी केले तसेच फिर्यादीची पत्नी नामे– सौ. शारदा निलकंठ पुंड ही सुद्धा झगडा सोडविण्याकरीता आली असता तिला सुध्दा हाताने ढकल ढुकल करून मारहाण केली व तिन्ही आरोपी नामे अनुक्रमे– १) संदीप रामेश्वर शिवनकर, वय ३० वर्ष २) गंगाराम शिवनकर ३) कु. मनुका सोमाजी शिवनकर तिन्ही रा. टाका ता. भिवापुर यांनी संगनमत करून फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा निखील तसेच फिर्यादीची पत्नी तिघांनाही मारहाण केली व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भिवापूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. ओरापीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ब. नं. १२०१ प्रफुल माहुरे पोस्टे भिवापूर मो. नं. ७७४१९४१२०१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. भिवापूर** :– अंतर्गत १७ कि.मी. अंतरावरील मौजा टाका भिवापूर येथे दिनांक ११/१२/२०२२ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– संदीप रामेश्वर शिवनकर, वय ३० वर्ष, रा. टाका ता. भिवापुर यांचे घरा शेजारी राहणारे आरोपी नामे– निलकंठ पुंड नमुद घटनावेळी फिर्यादी हा जेवण करून आपल्या घरासमोर उभा असता तेव्हा आरोपी निलकंठ पुंड हा फिर्यादीचे घरासमोरून जात होता व फिर्यादीचे घराकडे पहात असल्याने तेव्हा त्याला फिर्यादीने हटकले की, ''तु माझे घराकडे कशाला पाहतो'' असे म्हटले असता तेव्हा आरोपी निलकंठ पुंड हा फिर्यादीचे अंगावर येवुन पडला व फिर्यादीला आरोपी नामे– १) निलकंठ रामकिसन पुंड, वय ५९ वर्ष, २) गोविंदा पुंड ३) निखिल पुंड वय ५९ वर्श तिन्ही रा. टाका ता. भिवापुर यांनी फिर्यादीला हातातील लाकडी काडी घेवुन फिर्यादीचे डोक्यावर मारली व हातबुक्याने मारले तेव्हा फिर्यादीची आत्या नामे– मनुका शिवनकर ही भांडण सोडविण्याकरीता आली असता तिचे डाव्या पायाचे घुटण्यावर आरोपी निलकंठ पुंड यांनी काठीने मारले व त्यानंतर फिर्यादीचा भाऊ नामे– प्रदीप शिवनकर हा सुध्दा भांडण सोडविण्याकरीता आला असता त्याला सुध्दा तिघेही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीच्या भावाला सुध्दा तोंडावर काडीने मारून जखमी केले व शिवीगाळी करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन भिवापूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. ओरापीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ब. नं. १२०१ प्रफुल माहुरे पोस्टे भिवापूर मो. नं. ७७४१९४१२०१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**